ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २८ सप्टेंबर, १९६० | अंक ३८

## विविध माहिती

**भोपाळमध्यें कृषकभवन**—मध्यप्रदेश कृषक समाजानें भोपाळ येथें एक कृषकभवन बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या इमारतीसाठी ५० हजार रुपये खर्च येणार आहे. शेतकऱ्यांना आपला माल योग्य भावांत विकता यावा म्हणून त्यांना बाजारपेठांतील किंमतीं-बाबत भवनांत सल्ला देण्यांत येईल. व्यापाऱ्यांनीं शेतकऱ्यांचा माल पाडून घेऊं नये, म्हणून ही व्यवस्था करण्यांत आली आहे.

**गोदावरीच्या पाण्याचा उपयोग**—आंध्र सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें गोदावरी नदीवर धरण बांधण्याची सूचना केली आहे. ह्या योजनेसाठी १४ कोटी रुपये खर्च येईल. राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तिचा समावेश होण्याची शक्यता आहे. योजना पूर्ण झाल्यावर ४ लाख एकर दुपिकी जमिनीला फायदा होईल.

**गुजरातमधील पाटबंधारे**—गुजरात सरकारनें चालू वर्षांत बऱ्याच पाटबंधाऱ्यांचें काम त्वरेनें पूर्ण करण्याचें ठरविलें आहे. ह्या निर्णयाला अनुसरून सरकारनें १॥ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचें हें शेवटलें वर्ष आहे.

**शीतगृहांमुळें झालेला नफा**—सौराष्ट्रांतील कोळ्यांच्या सहकारी संस्थांनीं गेल्या वर्षी ७ कोटी रुपये नफा मिळविला. कोळ्यांनीं पकडलेले मासे शीतगृहांतून टिकविण्यासाठी ११५ शीतगृहांची एक मालिकाच सौराष्ट्रांत बांधण्यांत आली आहे. कांहीं भागांत तर दर तीन मैलांच्या अंतरावर अशीं शीतगृहें बांधण्यात आलीं आहेत.

**तुटीच्या अर्थकारणाला विरोध**—स्वतंत्र पक्षाचे अध्यक्ष श्री. एन्. जी. रंगा ह्यांनीं तुटीच्या अर्थकारणामुळें देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे असें मत प्रतिपादलें आहे. पैशाच्या पुरवठ्यांत २० टक्के वाढ झाली असून किंमती ४० ते ५० टक्क्यांनीं वाढल्या आहेत. त्यामुळें पैशाची किंमत एकसारखी कमी होत आहे असा त्यांचा अभिप्राय आहे.

**सोन्याचा भाव व स्त्रिया**—भारतामधील लोक सोन्याच्या जागतिक भावापेक्षा २॥ पट भावानें सोनें खरेदी करतात, ह्याबद्दल मध्यवर्ती सरकारच्या उपअर्थमंत्री श्रीमती तारकेश्वरी सिन्हा ह्यांनीं नापसंति व्यक्त केली आहे. सोन्याच्या भारतामधील भावाबद्दल त्यांनीं पुरुषापेक्षा स्त्रियांना अधिक दोष दिला आहे. सोन्याचा जागतिक बाजारांतील भाव सुमारें ५२ रुपये तोळा आहे.

**साखरेची पुन्हा निर्यात**—भारतामधील साखरेच्या उत्पादनांत गेल्या हंगामांत चांगली वाढ झाल्यामुळें मध्यवर्ती सरकारनें ५० हजार टन साखर निर्यात करण्याचें ठरविलें आहे. गेल्या वर्षी साखरेच्या उत्पादनांत ५ लाख टनांची वाढ झाली, साखर निर्यात करून भारताला सुमारें २ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ति होईल.

**क्यूबामधील तंबाखूचे कारखाने**—क्यूबाच्या सरकारनें देशांतील सिगार व सिगारेटचे कारखाने आपल्या ताब्यांत घेतले आहेत. क्यूबांतील अमेरिकन मालकीच्या तेलकंपन्या, साखरेचे कारखाने व रबराचे कारखाने ह्यापूर्वीच सरकारनें आपल्या मालकीचे केले आहेत.

**मध्यम बंदरांचा विकास**—मध्यम बंदरांचा विकास करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या कमिटीनें भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील अनेक मध्यम प्रतीच्या बंदरांचा विकास करण्याच्या शिफारसी केल्या आहेत. लोखंडाच्या खनिजाची निर्यात करण्याची पात्रता वाढावी अशा दृष्टीनें शिफारसी करण्यांत आल्या आहेत. दरसाल १·५ कोटी टन निर्यात करण्याचा सरकारचा इरादा आहे.

**कापसाच्या किमान किंमती**—गुजरात राज्यांत पिकणाऱ्या विविध कापसांच्या जातींसाठी किमान किंमत ठरविण्याचा विचार गुजरात सरकार करीत आहे. गुजरातमध्यें दरसाल १० लाख गासड्या कापूस पिकतो. देशांतील कापसाच्या एकूण उत्पादनाच्या एकपंचमांश इतका हा कापूस आहे. किंमती ठरविण्यांत आल्या तर कापसाच्या शेतकऱ्यांचा फायदा होईल.

**सक्तीच्या शिक्षणाची योजना**—बिहारच्या मंत्रिमंडळानें ६ ते ११ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना मोफत व सक्तीचें शिक्षण देण्याची योजना मंजूर केली आहे. योजना अंमलांत आणण्यासाठी ५० कोटी रु. खर्च येणार आहे. सध्यां शहरांतील प्राथमिक शाळांतून मोफत व सक्तीचें शिक्षण आहे. सुमारें २५ लाख मुलांना त्याचा फायदा मिळत आहे.

**नाविक दलासाठी बोट**—हिंदी नाविक दलासाठी भारतांत बांधण्यांत आलेली पहिली बोट नुकतीच समुद्रांत सोडण्यांत आली. बोटीचें वजन १४६ टन असून समुद्रकिनाऱ्यानजीक गस्त घालण्यास ती फार उपयोगी पडेल. ती बांधण्यास २५ लाख रु. खर्च आला. बोटीचें नांव 'अजय' असें आहे.

**सिंधू खोरें योजनेला मदत**—पाकिस्तान व भारत ह्या देशांमधील सिंधू खोरें योजनेला पश्चिम जर्मनीनें १२·६ कोटी मार्कस मदत देण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेंत पाणीपुरवठा व वीजनिर्मितीची सोय करण्यांत येणार आहे. अविकसित देशांचा विकास घडवून आणण्यासाठी पश्चिम जर्मनीनें दिलेली ही पहिली मोठी मदत आहे.

**फिल्मच्या आयातीमधील कपात**—परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें कच्च्या फिल्मच्या आयातींत कपात करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. धंद्यावर परिणाम न होईल अशा बेतानें हें धोरण अंमलांत आणण्याची विनंती चित्रनिर्मित्यांनी केली आहे. दक्षिण भारतामधील चित्रपटांची लांबी १५ ते १८ हजार फूट असते, तर हिंदी चित्रपटांची लांबी १३ ते १४ हजार फूट असते.

**प्रत्येक राज्यांत गोसंवर्धन संस्था**— अखिल भारतीय गोसंवर्धन समितीचे निर्णय अंमलांत आणण्यासाठी प्रत्येक राज्यांत लवकरच गोसंवर्धन संस्था स्थापन करण्यांत येणार आहेत. अखिल भारतीय गोसंवर्धन समितीनें गाईंच्या संरक्षणाचा व हिताचा कार्यक्रम जारीनें अंमलांत आणण्याचे ठरविले आहे. ही संस्था अन्न व शेतकी खात्याच्या मार्गदर्शनाखाली आहे.

**नायलॉनच्या कपड्याला बंदी**—कराचीमधील एका कॉलेजच्या प्रिन्सिपॉलनीं विद्यार्थिनींना नॉयलानचे कपडे वापरण्यास बंदी केली आहे. हे कपडे फार झिरझिरीत असल्यामुळें पुरुष-विद्यार्थ्यांचे एकचित्त होत नाहीं, अशी त्यांची तक्रार आहे. बंदी-विरुद्ध विद्यार्थिनींनीं मोहीम उघडली असून पुरुष-विद्यार्थ्यांनींहि मोहिमेला पाठिंबा दिला आहे.

**गिरनारला जाण्यासाठी मोटाररस्ता**— सौराष्ट्रामधील गिरनार पर्वतावर जाण्यासाठी मोटारींना वापरतां येईल असा रस्ता करण्याचा गुजरात सरकारचा विचार आहे. गिरनारचा थंड हवेचें ठिकाण म्हणूनहि विकास करण्यांत येण्याचा संभव आहे. रस्ता सुमारें २० मैल लांबीचा होईल व त्यासाठी २५ लाख रुपये खर्च येईल.

**पोलंड–भारत दर्यावर्दी वहातूक**—पोलंड व भारत ह्यांच्या दरम्यान बोटीच्या माल-वहातुकीची सर्व्हिस सुरू करण्याची प्राथमिक तयारी झाली आहे. दरमहा एक बोट भारतामधून पोलंडला जाईल. सध्यां जर्मनींत भारतासाठी बांधण्यांत येत असलेली एक बोट परस्पर पोलंडला जाऊन माल घेऊन येणार आहे. बोटीचें नांव 'विश्वकीर्ति' असें आहे.

**जपानचा वृंदवादकांचा ताफा**—जपानमधून आलेल्या वृंदवादकांचा एक कार्यक्रम दिल्ली येथील विज्ञानभवनांत करण्यांत आला. ह्या ताफ्यांत ११० संगीतज्ञ-वादक होते. जपानमध्यें पाश्चात्य संगीताचीहि चांगली प्रगति झाली आहे. ताफा नंतर मॉस्कोला रवाना झाला. भारतातर्फे त्याला एक वीणा भेट म्हणून देण्यांत आली.

**पंजाबमधील पुरामुळें हानि**— पंजाबमधील नद्यांना आलेल्या प्रचंड पुरामुळें दक्षिण पंजाबांतील पतिआळा व अंबाला भागांत फार नुकसान झालें आहे. २० ते २५ लाख लोकांना पुराचा तडाखा बसला आहे. १५ कोटी रुपये किंमतीच्या पिकांची हानि झाली आहे व ३ कोटी रुपये किंमतींचीं घरें बसलीं आहेत.

**निकामी पोलादाचा उपयोग**—भारतामधील रेल्वेखात्यांत दरसाल पुष्कळसें पोलादाचें सामान वापरून निकामी होतें. ह्या पोलादाचा उपयोग करून घेण्याचे खात्यानें ठरविलें आहे. ३१ मार्च, १९६० अखेर रेल्वेजवळ सुमारें २ लाख टन निकामी पोलाद होतें. अशा पोलादांत अलीकडे वाढच होत आहे.

**यंत्रसामग्रीचें उत्पादन**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतांत सुमारें ३०० कोटी रुपये किंमतीची औद्योगिक यंत्रसामग्री निर्माण करण्यांत येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. चालू सालीं १२० कोटी रुपये किंमतीची औद्योगिक यंत्रसामग्री तयार करण्यांत येईल.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत;
परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूंनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या सखोल व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पती-युक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनी प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

आर्य-वैद्यकाच्या इतिहासांतील महत्त्वाचें पान



१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.

# अर्थ

बुधवार, ता. २८ सप्टेंबर, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## गुजरात राज्यांत तेलशुद्धीचा कारखाना

मध्यवर्ती सरकारचे तेल व खाणमंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं गुजरात राज्याच्या विधान सभेच्या सभासदांसमोर भाषण करून राज्यांत उभारल्या जावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्याविषयीं माहिती सांगितली. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं खंबायत व अंकलेश्वर ह्या ठिकाणीं तेलाचे साठे उपलब्ध झालेले असले तरी अंकलेश्वर ह्या ठिकाणीं तेलशुद्धीचा कारखाना उभारण्यांत येण्याची शक्यता अधिक आहे. कारण, अंकलेश्वर येथील तेलाचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर आहे आणि त्याचा दर्जाहि अधिक चांगला आहे. दोन्ही ठिकाणीं नैसर्गिक वायु उपलब्ध होण्यासारखा आहे. भारत सरकारनें गुजरातमधील तेल गाळण्यास उपयुक्त ठरेल अशा प्रकारचा कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. तथापि कारखाना उभारण्याचा निर्णय घेतल्यावर तो उभारला जाण्यास व त्यांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होण्यास १८ पासून २४ महिन्यांपर्यंत काळ लागेल. १९६३ च्या अखेरीपर्यंत गुजरात राज्यांत तेलशुद्धीचा कारखाना उभारतां येईल असें वाटतें. कारखान्याची उत्पादनक्षमता किती असावी ह्याबद्दल अद्याप निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. ह्यासंबंधीं तपशीलवार माहिती गोळा करण्यांत येत आहे. ती हातीं आल्यावर जास्तींत जास्त उत्पादनक्षमता असणारा कारखाना उभारण्याचा विचार करण्यांत येईल. आतांपर्यंत तेलाच्या विहिरी खोदण्यासंबंधीं जें यश आलें आहे, त्यावरून व्यापारी प्रमाणांत तेलाचें उत्पादन करण्याइतका तेलाचा भूमिगत साठा उपलब्ध झाला आहे असें म्हणतां येईल. गुजरात राज्यांतील तेल कोठेंहि शुद्ध करण्यांत आलें तरी त्यावर राज्याला रॉयल्टी मिळेल.

## पोलाद कारखान्यांच्या विस्ताराचा कार्यक्रम

भारत सरकारच्या पोलाद व खाणी खात्याचे मंत्री सरदार स्वर्णसिंग ह्यांनीं भिलई येथें पत्रकारांशीं बोलतांना देशांतील पोलादाच्या कारखान्यांच्या विस्ताराच्या कार्यक्रमाची माहिती सांगितली. ते म्हणाले कीं, भारतांत उभारण्यांत आलेल्या तिन्ही पोलादाच्या कारखान्यांचा विस्तार करण्याचें काम तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हातीं घेण्यांत येणार आहे. हा कार्यक्रम पार पाडण्यांत आला म्हणजे तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारताच्या पोलादाच्या उत्पन्नांत ३५ लाख टनांची भर पडेल. भिलई येथील पोलादाचें उत्पादनच १० लाख टनांनीं वाढेल. त्याचप्रमाणें कारखान्यांतील कच्चा लोखंडाचें उत्पादनहि ३ ते ४ लाख टनांनीं वाढेल व रूरकेला, दुर्गापूर येथील कारखान्यांतून आणखी १५ लाख टन पोलादाचें उत्पादन होऊं लागेल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत उभारण्यांत येणाऱ्या बोकॅरो येथील पोलादाच्या कारखान्याची उत्पादनक्षमता १० लाख टनांच्या आसपास असेल. पोलादाच्या कारखान्यांच्या उत्पादनवाढीचा हा कार्यक्रम हिंदी तंत्रज्ञाकडून आखण्यांत येईल आणि त्यांच्याच हस्तें तो पार पाडण्यांत येईल. बोकॅरो येथील कारखानाहि मुख्यत: हिंदी तज्ज्ञांकडूनच उभारला जाईल. मात्र कांहीं महत्त्वाच्या विभागांत परदेशीय तंत्रज्ञांची मदत भारताला घ्यावी लागेल. पोलादाच्या कारखान्यांसाठीं लागणारा कोळसा योग्य वेळीं पुरविण्यासाठी रेल्वेखात्याच्या सहकार्यानें एक आराखडा तयार करण्यांत आला आहे. त्यामुळें पोलादाच्या कारखान्यांना कोळशाचा तुटवडा पडणार नाहीं.

## बोलपटाच्या धंद्यासंबंधी सरकारी सल्ला

भारत सरकारच्या उपअर्थमंत्री श्रीमती तारकेश्वरी सिन्हा ह्यांनीं बोलपटांतील धंदेवाइकांना मार्गदर्शन केलें आहे. साऊथ इंडिअन फिल्म चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभासदांपुढें त्या भाषण करीत होत्या. त्या आपल्या भाषणांत म्हणाल्या कीं बोलपटाच्या निर्मितीच्या धंद्यांत अलीकडे मक्तेदारीची प्रवृत्ति दिसून येऊं लागली आहे. ही प्रवृत्ति वेळींच नाहींशी केली पाहिजे. त्याचप्रमाणें भारतांत निर्माण करण्यांत येणाऱ्या बोलपटांची लांबीहि कमी करण्यांत आली पाहिजे. भारतीय बोलपट वाजवीपेक्षा अधिक लांब असल्यामुळें आयात होणाऱ्या कच्च्या फिल्मचा वापर जितका काटकसरीनें व्हावयास पाहिजे तितका होत नाहीं. भारतीय चित्रपट परदेशांत खपविण्याच्या दृष्टीनें परदेशीय बाजारपेठांचा अभ्यासहि करण्यांत आला पाहिजे. ह्या धंद्यावरील कराचा बोजा हलका करण्यांत यावा अशी मागणी करण्यांत येत असते. ह्यासंबंधी विचार करतांना तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या गरजा काय आहेत त्या लक्षांत घेतल्या पाहिजेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत सरकारला करांच्या रूपानें १,६०० कोटी रु. उभारावे लागतील. एखाद्या धंद्याला कराच्या बोजाखालीं गुदमरून टाकण्याचें सरकारचें धोरण नाहीं. परंतु कांहीं एका मर्यादेपलीकडे धंद्याला मदत करणें सरकारला शक्य होणार नाहीं. अलीकडे बोलपटाच्या निर्मितीच्या खर्चाचे आंकडे फुगत चालले आहेत. असें कां होत आहे ह्याचे निर्मात्यांनीं संशोधन करावें. नटांना भरमसाठ वेतन देण्याच्या पद्धतीमुळें बोलपटांच्या धंद्यांत एकप्रकारचा चमत्कारिक चलनफुगवटा आलेला आहे.

## बंगलोर येथें निघणारा मनगटी घड्याळांचा कारखाना

मनगटी घड्याळें तयार करणारा भारतामधील पहिला कारखाना बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्यांत काढण्यांत येणार आहे. कारखान्याची प्राथमिक तयारी आतां पूर्ण होत आली आहे. कारखान्याच्या आंखणीचें काम करण्यासाठी येणारे जपानी तज्ज्ञ बहुधा पुढील महिन्यांत बंगलोर येथें दाखल होतील. जपानी तंत्रज्ञांचा हा पहिला गट आहे. कारखान्याची प्रत्यक्ष उभारणी व जरूर त्या हिंदी तंत्रज्ञांचें शिक्षण ह्या कामासाठी दोन वर्षांचा अवधि लागेल असा अंदाज आहे. १९६२ च्या ऑक्टोबरमध्यें कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होण्याची शक्यता वाटत आहे. १९६२ च्या अखेरीस अगर १९६३ च्या आरंभीं बाजारांत कारखान्यांत तयार झालेलीं घड्याळें दिसूं लागतील.

## पुणें सेंट्रल को-ऑप. बँकेची वार्षिक सभा

पुणें सेंट्रल को-ऑप. बँकेच्या वार्षिक साधारण सभेस रविवार दिनांक २५-९-१९६० रोजीं सायंकाळीं ५ वाजतां सुरुवात झाली. प्रारंभीं बँकेचे अध्यक्ष मा. शिवाजीराव काळे यांनीं बँकेच्या प्रगतिपर कामकाजाचा वृत्तान्त व अहवाल वाचून दाखविला. त्यानंतर सन १९५९-६० सालची नफावांटणी व ताळेबंद मंजुरीसाठी ठेवण्यांत आला तो एकमतानें मंजूर झाला.

पुढील सालासाठी निवड झालेल्या उमेदवारांचीं नांवें जाहीर करण्यांत आलीं. सन १९६०-६१ सालासाठी खालीलप्रमाणें संचालकपदावर नियुक्ति झाली. पुणें शहरांतून वैयक्तिक भागीदारांतर्फे :—(१) महापौर वा. ब. गोगटे, सर्वश्री (२) ल. गो. सहस्रबुद्धे, (३) दि. वि. इनामदार, (४) रा. य. बोरकर व (५) वि. त्रिं. टिळक.

पुणें शहराबाहेरील व्यक्तिशः भागीदारांतर्फे—श्री. गो. पां. पवार

शेतकी सोसायट्यातर्फे:—श्री. वि. स. देशमुख (पुरंदर), श्री. सि. भि. धुले (हवेली व पुणें शहर), श्री. पं. शं. शेळके (दौंड), श्री. द. वा. ढमढेरे (शिरूर), श्री. सा. मा. सातकर (खेड), श्री. शि. भि. निंबाळकर (इंदापूर), श्री. मु. सा. काकडे (बारामती), श्री. द. स. लेंडे (जुन्नर), श्री. का. मो. सावळे (आंबेगांव), श्री. शं. म. भेलके (भोर, वेल्हें महाल), श्री. र. शं. सातकर (मावळ, मुळशी).

बिगर शेतकी सोसायट्यांतर्फे—(पुणें शहर) श्री. ना. कृ. साठे

बिगर शेतकी सोसायट्यांतर्फे—(पुणें शहर सोडून) श्री. मा. बा. जाधव.

तालुका खरेदी-विक्रीसंघातर्फे—श्री. शिवाजी महादेव काळे, एम्. एल्. ए.

हिशेबतपासनीस:—श्री. रा. कृ. देशपांडे व श्री. बा. ल. फाटक.

याखेरीज पुणें जिल्हा खरेदी-विक्रीसंघातर्फे श्री. बाबुराव घुमाळ व श्रीछत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखान्यातर्फे भि. वि. निंबाळकर यांची नियुक्ति झाली.

वरीलप्रमाणें निकाल जाहीर करून अध्यक्षांनीं त्यांचें हार्दिक अभिनंदन केलें. तसेंच अध्यक्षपदासाठी, जुन्नरचे लोकप्रिय आमदार श्री. शिवाजीराव काळे यांची बहुमतानें निवड झाली; अध्यक्ष-पदासाठी त्यांच्या नांवानें सुमारें पंचवीस सूचना व अनुमोदनें जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यांतून आलीं होतीं. त्याचप्रमाणें उपाध्यक्षपदासाठी, सणसरचे श्री. शिवाजीराव भिकुलाल निंबाळकर यांची बिनविरोध निवड झाली.

यंदा बँकेनें भाग भांडवलांत वाढ करावयाची ठरविली होती. त्या प्रयत्नास गेल्या अवघ्या दोनच महिन्यांत जें सहकार्य बँकेला मिळालें यावद्दल मा. अध्यक्ष श्री. शिवाजीराव काळे, यांनीं प्रशंसा करून, मनःपूर्वक आभार मानले.

सभेच्या वेळीं बँकेनें श्रीशाहु मंदिर शिक्षण संस्थेस रुपये वीस हजाराची देणगी जाहीर केली. या प्रसंगीं श्री. वि. द. घाटे यांनीं बँकेचे आभार मानले व देणगी देऊन बँकेनें सहकारी क्षेत्राबरोबरच शिक्षणास बहुमोल मदत दिल्याबद्दल अभिनंदन केलें.

---

**रोजगार पुरविण्याकडे लक्ष पाहिजे**—इंडिअन मर्चंटस चेंबरचे अध्यक्ष श्री. प्रतापसिंग मथुरादास ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचें धोरण ठरवितांना लोकांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्याकडे लक्ष देण्यांत आलें पाहिजे. अशा संधि निर्माण करण्याची आज अतिशय गरज आहे.


# भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९३३)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार प. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

रावसाहेब य. द. खोले

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके



# बँक ऑफ पूना, लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा..

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५९ रविवार पेठ, पुणें — गो. गं. साठे, मॅनेजर

## बँकरेटमध्यें अप्रत्यक्ष वाढ

किंमतवाढ रोखून धरण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें बंधनाच्या तीन योजना जाहीर केल्या आहेत:—(अ) प्रत्येक बँकेला ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा जास्त कर्ज रिझर्व्ह बँकेकडून घेतलें जाईल, तर त्यावर जादा व्याजाची आकारणी, (ब) बँकांनीं आपल्या कर्जदारांवर आकारावयाच्या व्याजांत अर्ध्या टक्क्याची वाढ, आणि (क) अल्पमुदतीच्या ठेवींवर बँकांनीं द्यावयाच्या व्याजावर बंधनें. ह्यांची अंमलबजावणी १ ऑक्टोबर, १९६० पासून केली जाईल.

(अ) प्रत्येक शेडयूल्ड बँकेला रिझर्व्ह बँकेकडून मिळावयाच्या कर्जाची रक्कम ठरवून देण्यांत येईल. ही रक्कम त्या बँकेनें रिझर्व्ह बँकेकडे रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ (१) कलमाखाली ठेवावयाच्या (डिमांड ठेवींच्या ५% अधिक टाइम ठेवींच्या २%) रिझर्व्हच्या ५०% इतकी असेल. ह्या ठरवून दिलेल्या मर्यादेपर्यंतच्या कर्जावर बँक रेटनें आकारणी होईल. त्या मर्यादेपेक्षा २००% पर्यंत जास्त कर्जावर, बँकरेटपेक्षा एक टक्का जास्त व्याज आकारलें जाईल. मर्यादेपेक्षा २००% च्या वरील कर्जावर बँकरेटपेक्षा दोन टक्के ज्यास्त व्याज द्यावें लागेल. बिलमार्केट योजनेखाली कर्जाच्या कमाल मर्यादा तूर्त बदलण्यांत आलेल्या नाहींत.

(ब) शेडयूल्ड बँकांनीं सर्व, नव्या-जुन्या, तारणावरील वा तारण नसलेल्या, कर्जावर किमान ५% व्याज आकारावयाचें आहे. इतर बँकांना (सहकारी बँका धरून) दिलेल्या कर्जांना हा किमान व्याजाचा नियम लागू नाहीं. ज्या बँकांचा कर्जावरील व्याजाचा दर आजच ५% किंवा त्यापेक्षा जास्त असेल, त्यांनीं आणखी वाढवावा; सरासरी दरांत किमान ½% ची वाढ करावी.

(क) नोटीस दिल्यानंतर परत द्यावयाच्या किंवा २१ दिवसांपेक्षा कमी मुदतीच्या कोणत्याहि ठेवीवर, आतां कोणत्याहि शेडयूल्ड बँकेला "बँकरेट उणें २%" ह्या दरापेक्षा जास्त व्याज देतां येणार नाहीं. बँका–बँकांतील ठेवींना हा नियम लागू नाहीं.

बँकरेटमध्यें रिझर्व्ह बँकेनें सरळ वाढ केलेली नसली, तरी कर्जदारांना कर्जे अधिक महाग केलीं गेलीं आहेत. रिझर्व्ह बँकेच्या निर्णयाला अनुसरून आपले व्यवहार बदलण्यांत आतां बँका गुंतल्या आहेत. रिझर्व्ह बँकेकडून घेतलेल्या कर्जांत कित्येक बँका घट करतील आणि दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर अर्धा ते एक टक्क्यानें वाढवतील. शेडयूल्ड बँकांची रिझर्व्ह बँकेकडील रिझर्व्हची रक्कम ९ सप्टेंबर रोजीं ६२·६२ कोटी रु. होती. त्याच्या ५०% म्हणजे ३१·३१ कोटी रुपयांच्या कर्जावर त्यांना बँकरेटनें रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळेल; ९१·९३ कोटी रु. पर्यंतच्या कर्जास ५% दर लागू होईल आणि त्यापुढील कर्जास ६% दर लागू केला जाईल. सध्यां शेडयूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून ५२ कोटी रु. कर्जाऊ घेतलेले आहेत. म्हणजे त्यांना आतां ठरवून दिलेल्या कोट्यापेक्षा त्यांनीं २० कोटी रुपये जास्त घेतलेले आहेत.

चालू मंदीच्या मोसमांतहि बँकांनीं दिलेल्या कर्जांत २९ एप्रिल ते ९ सप्टेंबर ह्या मुदतींत फक्त २·९८ कोटी रुपयांची घट झाली; गेल्या वर्षी ह्याच मुदतीमध्यें ९५·९६ कोटी रुपयांची घट झाली होती. ह्याच्या उलट, शेडयूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलीं कर्जे ८·१९ कोटी रुपयांनीं वाढलीं आहेत; गेल्या वर्षी ह्याच मुदतींत तीं २७·३२ कोटी रुपयांनीं कमी झालीं होतीं. ही पार्श्वभूमि लक्षांत घेतली, म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणांचा योग्य प्रकारें अर्थ लावतां येईल. ज्या बँका व्यापारी पिकांना कर्जे मोठ्या प्रमाणावर देतात, त्यांना हीं नियंत्रणें जाचक होतील. ह्या वर्षीचीं कपास, तेलबिया, ऊंस, इत्यादींचीं पिकें चांगलीं आलीं असून त्यांच्या व्यापाराला आणि निर्गतीला अधिक कर्जाची गरज भासणार आहे; पण, ती भागवितां येणें कठीण होणार आहे.

## पूना अर्बन को. बँकेचे नवे पदाधिकारी

**सल्लागार मंडळ**

(१) मा. शंकरराव दशरथराव उरसळ बी. ए. (अध्यक्ष)
(२) „ दत्तात्रेय बलवंत इनामदार
(३) „ किसन लक्ष्मण बारणे
(४) „ आनंदराव सावळाराम देशमुख
(५) „ दत्तात्रय श्रीपती भोसले

**व्यवस्थापक मंडळ**

(१) मा. दिगंबर विष्णु इनामदार (कार्याध्यक्ष)
(२) „ रणछोड पांडुरंग भोंडे बी. ए., एलूएल्. बी. (उपकार्याध्यक्ष)
(३) „ लक्ष्मण धर्माजी ढुंबरे
(४) „ वसंत लक्ष्मण गोसावी
(५) „ व्यंकटेश नागेश पोळ
(६) „ मारुतराव मल्हारराव पवार
(७) „ देविदास त्र्यंबक विसाळ एल. सी. पी. एस. (मुंबई)
(९) „ नामदेव अनंता सुकाळे

**स्थानिक हिशोबतपासनीस**

मा. रामचंद्र कृष्णाजी देशपांडे, बी. ए., बी. कॉम्., जी. डी. सी. अँड ए.

ज्ञानप्रकाशानें दीपावलि उजळवून सोडणारा

# ज्ञा न दू त

संपादिका : तारा वडेर ‖ कार्यालय : नोगी आणि कं. गिरगांव रोड मुंबई.

**महनीय मानकऱ्यांच्या मेळाव्यांत अज्ञानतमाचा नाश करण्यासाठीं वाजतगाजत येत आहे.**

*नामवंत चित्रकार मुळगांवकर व कनु देसाई यांच्या कुंचल्यांतून उतरलेलीं सात अप्रतिम तिरंगी चित्रें, महाराष्ट्रांतील थोर साहित्यकारांचे विचारपरिप्लुत लेख, भारतीय संतांच्या दुर्मिळ आठवणी, नवा साज चढविलेल्या महाभारतीय कथा, आदि विविध व संग्राह्य साहित्य ह्या अंकांत आहे. थोडक्यांत साऱ्या कुटुंबानें एकत्र बसून वाचण्याजोगा व दीपावलीचा आनंद द्विगुणित करणारा "ज्ञानदूत" आपल्या सेवेसाठीं लवकरच येत आहे.* **एजंटांनीं व जाहिरातदारांनीं त्वरा करावी.**

## महाराष्ट्र राज्य शेती व ग्रामीण विकास परिषद्

### महत्त्वाच्या विषयांवर प्रातिनिधिक चर्चा

ता. २५ मार्च, १९६० रोजीं मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबई येथें भरलेल्या मराठी आमदारांच्या सभेंत ठरल्याप्रमाणें महाराष्ट्र राज्याची पहिली शेती व ग्रामीण विकास परिषद् भरविण्याची जबाबदारी डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशननें पत्करली असून ही परिषद् मराठवाड्यांत औरंगाबाद् मुक्कामीं ता. १५, १६ व १७ ऑक्टोबर, १९६० या दिवशीं घेण्याचें तिनें आतां निश्चित केलें आहे. परिषदेच्या अध्यक्षस्थानीं महाराष्ट्राचे एक ख्यातनाम पुढारी खासदार बॅ. रामराव देशमुख यांची निवड केली आहे. असोसिएशनच्या विनंतीस मान देऊन महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं परिषदेचें उद्घाटन करण्याचें मान्य केलें आहे.

सदर परिषदेंत महाराष्ट्रांतील शेती व ग्रामीण जीवनाशीं निगडित असलेल्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर विचार-विनिमय होणार आहे. हे विषय सोईच्या दृष्टीनें पुढीलप्रमाणें सहा गटांत विभागले आहेत: १. जमीनधारणविषयक धोरण; २. जमीन व पाणी-पुरवठा; ३. पिकें; ४. जंगल-संरक्षण व पशुपालन; ५. सहकारी संस्था, ग्रामीण उद्योगधंदे व शेतकऱ्यांच्या संस्था आणि ६. ग्रामीण स्वास्थ्य. प्रत्येक विभागांतील चर्चा मुद्देसूद, सुसूत्र व उपयुक्त होण्याचे दृष्टीनें त्या त्या विषयावरील तयार केलेलीं टांचणें प्रतिनिधींना अगोदर पुरविलीं जातील. प्रत्येक विभागासाठी त्या त्या विषयांतील तज्ज्ञ मंडळींची अध्यक्ष, उपाध्यक्ष व सेक्रेटरी म्हणून काळजीपूर्वक निवड करण्यांत आली आहे.

परिषदेचें उद्घाटन मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्तें शनिवार ता. १५ ऑक्टोबर १९६० रोजीं सकाळीं झाल्यावर बॅ. रामराव देशमुख यांचें अध्यक्षीय भाषण होईल. ता. १६ ची सकाळ-दुपार वर उल्लेखिल्याप्रमाणें विभागवार बैठकीसाठी राखून ठेविली असून ता. १७ ला सकाळीं व दुपारीं परिषदेचें खुलें अधिवेशन भरेल. खुल्या अधिवेशनांत निरनिराळ्या विभागांवर समित्यांतील चर्चेतील निष्कर्ष मंजुरीसाठी मांडण्यांत येतील व त्यावर चर्चा होईल.

परिषदेस जोडून एक शेतीविषयक प्रदर्शन भरविलें जाणार असून त्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्याच्या संबंधित खात्यांनीं पत्करली आहे.

परिषद् जास्तींत जास्त प्रातिनिधिक व्हावी म्हणून खालील प्रकारच्या संस्थांना त्यांचे प्रतिनिधी पाठविण्याबद्दल पाचारण करण्यांत येईल.

१. जिल्हा सहकारी बँका, २. जिल्हा खरेदी-विक्री संघ, ३. जिल्हा लोकल-बोर्डें, ४. जिल्हा विकास मंडळें, ५. जनपद सभा, ६. जिल्हा मार्केट कमिटीज, ७. जिल्हा पंचायत मंडळें, ८. जिल्हा औद्योगिक सहकारी संघ, ९. शेतकरी संघ, १०, कृषक समाज, ११. सर्वोदय केंद्रें, १२. खादी व ग्रामोद्योग मंडळें, १३. बिनसरकारी ग्रामीण विकास मंडळें, १४. शेतमालाची प्रक्रिया करणाऱ्या मोठ्या सहकारी संस्था, १५ फळफळावळ उत्पादकांच्या संस्था, १६ मोठ्या प्राथमिक सहकारी व तालुका संस्था, १७. शेतकरी सभा अगर संघटना, १८. बागायतदार संघ, १९. रिझर्व्ह बँक, शेती-विभाग, २०. मुंबई सहकारी बँक, २१. महाराष्ट्र राज्य विभागीय सहकारी बोर्डस्. वरील प्रकारच्या संस्थांशिवाय कांहीं प्रमुख शेतकरी, पक्षप्रमुख, आमदार, खासदार व संबंधित प्रमुख सरकारी अधिकारी यांनाहि परिषदेसाठी बोलवावें असें ठरलें आहे.

यांतेरीज, या विषयांत लक्ष घालणाऱ्या कोणास प्रतिनिधी म्हणून परिषदेच्या कामांत भाग घेण्याची इच्छा असेल तर त्यालाहि हजर राहतां येईल. सर्वांसाठी प्रतिनिधी-शुल्क फक्त रु. १ ठेवण्यांत आलें आहे. परिषदेस येणाऱ्या सर्व प्रतिनिधींच्या राहण्याची व जेवण्याची व्यवस्था परिषदेच्या स्वागत समितीनें करण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी दररोज प्रत्येकीं रु. ३ आकार पडेल. परिषदेस येणाऱ्या प्रतिनिधींनीं, त्यांच्या राहण्या-जेवण्याची व्यवस्था करण्याचें सुलभ होण्याचे दृष्टीनें स्वागत समितीला अगोदर कळविणें जरूर आहे.

प्रत्यक्ष परिषदेसाठी व शेतीविषयक वाङ्मय पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणें वगैरेसाठी बराच खर्च येणार आहे. त्यासाठी परिषदेचें उद्दिष्ट व महत्त्व लक्षांत घेऊन, शेती व ग्रामीण विकासाच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्थांनीं व व्यक्तींनीं परिषदेसाठी डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनला सढळ हातांनीं आर्थिक साहाय्य करावें. तसेंच परिषदेस हजर राहून ती यशस्वी करण्यास मदत करावी अशी विनंती आहे. आपली देणगी आपण डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनच्या नांवानें क्रॉस चेकनें पाठवावी.

सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी,
पुणें ४.
ता. ८ सप्टेंबर, १९६०

आपला,
ध. रा. गाडगीळ,
अध्यक्ष,
डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन

---

### बँकांतील ठेवींच्या विम्याची योजना

रिझर्व्ह बँकेनें डिपॉझिट इन्शुअरन्सची एक योजना तयार करून ती इंडियन बँकर्स असोसिएशनकडे पाठविली आहे आणि तिचेवर असोसिएशनच्या सूचना मागविल्या आहेत. ह्या महिन्याच्या अखेरीस अर्थमंत्र्यांचेबरोबर अमेरिकेला रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर श्री. एम्. व्ही. रंगाचारी हे जाणार आहेत, तेव्हां ते तेथें अंमलांत असलेल्या योजनेचा अभ्यास करतील. ते परत आल्यावर योजनेचा खर्डा पक्का करण्यांत येईल.

---

### रिझर्व्ह बँकेच्यां नोटांचें तारण

इश्यू खातें
३० जून, १९६०

| देणें रु. | जिंदगी रु. |
|---|---|
| बँकिंग खात्यांतील नोटा ४६,१९,५१,२७१ | सोनें ११७,७६,०२,७५० |
| व्यवहारांत खेळत्या नोटा १८,२९,४३,०३,७६८ | विदेशी रोखे १४३,०९,८९,६२९ |
| | रुपये १२८,४५,७७,०३९ |
| एकूण काढलेल्या नोटा ( एकूण देणें ) १८७५,६२,५५,०३९ | भारत सरकारचे रोखे १४,८६,३९,८५,६२१ |
| | एकूण जिंदगी १८,७५,६२,५५,०३९ |

---

**मालवाहतुकीच्या डब्यांचें उत्पादन**— रेल्वेखात्यानें मालवाहतुकीच्या डब्यांचें उत्पादन जलदीनें वाढविण्याचें ठरविलें असून त्यासाठी १ लाख टन पोलाद आयात करण्याची मागणी नोंदविली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत रेल्वेखात्यानें जितके डबे तयार करण्याचें ठरविलें होतें तितके तयार होणार नाहींत असें दिसूं लागलें आहे. पोलादाच्या तुटवड्यामुळें असें झाल्याचें कळतें.

## पूर्व खानदेश सें. को. बँक लि.

वरील बँकेच्या ३९ शाखा आहेत. गेल्या वर्षी वसूल भांडवलांत १,७६,००० रु. ची वाढ होऊन, तें ३९,२१,००० रु. झालें. ठेवींतहि वाढ होऊन त्यांची रक्कम ३,३१,१९,२६४ रु. झाली. एकूण कर्जांत ४६ लक्ष रु. ची वाढ होऊन तें २२३ लक्ष रु. आहे. चालू व हंगामी कर्जवसुलीचें शेंकडा प्रमाण ७७.१ व ६८.५ असें पडलें. मध्यम मुदतीच्या कर्जांतहि ५ लाखांचेवर वाढ झाली आहे. बँकेस अहवालाचे सालीं एकूण ४,५६,५८६ रु. नफा झाला आहे. शेतकऱ्यांना आपल्या शेतीच्या मालास चांगला भाव मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य सरकार गुदाम मंडळातर्फे जळगांव, पाचोरे, अंमळनेर, वगैरे प्रमुख बाजारपेठांच्या ठिकाणीं गुदामें उघडलीं आहेत. गुदामामध्यें माल ठेवणाऱ्यावर मिळणाऱ्या पावतीवर सुलभतेनें कर्जे घेतां यावीं, म्हणून संचालक मंडळानें पोटनियमांत दुरुस्त्या सुचविल्या आहेत.

"पतपेढ्यांतील सभासदांची पायलट कर्जाची मागणी पाहतां सहकारी संस्थेमार्फत आपला शेती माल विक्री करण्याचे बाबतींत बहुसंख्य सभासदांमध्यें अजूनहि नैराश्यच दिसून येतें. त्यामुळें पुरेपूर कर्जयोजनेचा फायदा घेणाऱ्या सभासदांची संख्या साहजिक बरीच कमी आहे. शेतकऱ्यांचा माल कच्चा न विकतां तो पक्का करून विकावा म्हणून जामनेर, चोपडा, अमळनेर व यावल या ठिकाणीं सहकारी प्रक्रिया सोसायट्या काढल्या आहेत आणि त्यांना सरकारी भाग भांडवलहि मिळालें आहे. त्या कार्यान्वित झाल्यावर साहाजिकच शेतकऱ्यांना सहकारी विक्रीचा फायदा सहज दृष्टोत्पत्तीस येईल आणि परिणामीं सध्यां दिसत असलेली निराशा व अनास्था आपोआप कमी होईल अशी आशा आहे. शेतकऱ्यांनीं उत्पन्न केलेला कच्चा माल पक्का करून एकजुटीनें विक्री केल्याविना, म्हणजेच उत्पादक व व्यापारी या दुहेरी भूमिकेंतून शेतकरी गेल्याविना त्याचा तरणोपाय नाहीं."

---

## ठाणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

वर्षअखेर बँकेचें भाग भांडवल ७,७५,६५० रु. होतें तें आतां ८,११,८०० रु. झालें आहे. पूर्वीच्या मुंबई राज्य सहकारी बँकेच्या जिल्ह्यांतील शाखांत अंदाजें ७६ लाखांच्या ठेवी होत्या, त्यापैकीं ४६ लाखांच्या ठेवी ह्या बँकेकडे वर्ग झाल्या. सालअखेर ठेवींची रक्कम ५५.४६ लक्ष रु. असून आतां ती ५९ लक्ष रुपयांवर गेली आहे. बँकेनें ४२.६८ लक्ष रु. चीं कर्जे दिलेलीं आहेत. ठाणें जिल्ह्यांत सहकारी अर्थव्यवस्था अधिकाधिक यशस्वी होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. सहकारी भात गिरण्या, सहकारी मच्छीमारी, इत्यादींची वाढ होण्यास आणि सहकारी खरेदी-विक्रीचा प्रसार होण्यास अनुकूल परिस्थिति आहे. तेव्हां, नजीकच्याच काळांत बँकेचा व्याप खूपच वाढून ती अधिक उपयुक्त कार्य करूं लागेल.

---

## दि भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ

वरील बँकेस १९५९-६० मध्यें ३०,४८२ रु. नफा झाला; मागील वर्षी तो २८,४२० रु. होता. येणें कर्जे १२ लक्ष, ४२ हजार रु. चीं आहेत. चालू परिस्थितींत कर्जवसुली समाधानकारक झाली, असें म्हणतां येईल. शेअरभांडवल १,८९,१५० रु., मेंबरांकडून ठेवी १४,१०,९२७ रु., बिगर-मेंबरांच्या ठेवी १८,३७,५१५ रु., गंगाजळी व इतर फंड ३,५९,५६१ रु., एकंदर भांडवल ४१,९३,७७९ रु. असे बँकेच्या व्यवहाराचे प्रमुख आंकडे आहेत. तरत्या भांडवलाचें ठेवींशीं % प्रमाण ८०-०४ इतकें पडतें. बँकेच्या मेडिकल वस्तूंच्या योजनेचा १०१ सभासदांनीं फायदा घेतला.

## दि इचलकरंजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मागील वर्षाच्या अखेरीस शेअर भांडवल रु. १,३५,४२५ इतकें होतें. या वर्षी रु. १,४५,९७५ आहे. निरनिराळ्या फंडांची एकूण रक्कम रु. २,८४,५८१ होती, ती ३,१९,३८२ रु. इतकी झाली आहे. अशा रीतीनें बँकेचे स्वतःचे भांडवलांत ३४,८०१ रु. नें वाढ झाली आहे. बँकेचे कार्यक्षेत्रांबाहेरील सभासदांचे शेअर्सची रक्कम सभासदांकडून अगर वारसाकडून मागणी आल्यास परत करण्याचें धोरण बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं अंगीकारिलें आहे. अहवाल-सालांत बँकेकडील सर्व प्रकारच्या ठेवींच्या रकमेंत चाल ठेवीखेरीज चांगली वाढ झाली. सेव्हिंग्ज ठेवीच्या रकमेंत २,३०,०७१ व मुदत ठेवीच्या रकमेत रु. ५३,३२७ नें वाढ झाली आहे. गतसालीं कर्जे व कॅशक्रेडिट वगैरे एकूण येणें रु. १३,२७,३९१ होतें. सालअखेरीस येणें रु. १४,७७,७६४ इतकें आहे. गतं सालीं थकबाकी रु. २,१२,७८५ इतकी होती ती चालू सालाअखेरीस रु. १,५२,६७४ आहे. गतसालीं येणें बाकीशीं थकबाकीचें प्रमाण १६ टक्के होतें तें चालू सालीं १०,०३ इतकें आहे. बँकेस ४७,१०४ रु. नफा झाला.

---

## दि तासगांव अर्बन को. बँक लि.

अहवालाचे वर्षी शेअर भांडवल ४२० रु. नीं व इतर फंड ६,३७३ रु. नीं वाढले. ठेवींत १,२६,३७३ रु. ची वाढ होऊन त्या ४,५२,६१० रु. च्या झाल्या. माल तारण व्यवहार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर केलेला असून इतर कर्जाचे व्यवहारांतहि योग्य ती दक्षता घेतलेली आहे. निव्वळ नफा ७,३४० रु. झाला; म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा तो ७१० रु. नीं जास्त आहे. शिवाय, चालू सालीं इमारत घसारा म्हणून ७४० रु. काढावे लागले. १९६१ मध्यें बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीनें रौप्यमहोत्सवनिधीची तरतूद केलेली आहे. थकबाकीचें प्रमाण ६.९% नें कमी करण्यांत आलें आहे.

---

## वैश्य को. बँक लि., मुंबई ४

वृत्तांतवर्षाच्या आरंभीं सभासदसंख्या ९,५७ होती, ती वर्षअखेर १,००७ झाली. भाग भांडवल ७७,४०० रु. वरून ८२,४३० रु. वर गेलें आणि खेळतें भांडवल ४,६८,२७३ रु. चें ५,७४,९५४ रु. झालें. एकूण ठेवींतहि ८१,४८६ रु. ची वाढ होऊन वर्षअखेर ३,४९,१९५ रु. च्या ठेवी आहेत. वृत्तांतवर्षी कार्यकारी मंडळानें "त्रैवार्षिक" आणि "स्पेशल" अशा दोन नवीन बचत योजना कार्यवाहींत आणल्या. निव्वळ नफा ११,१३६ रु. उरला.

---

**गाड्यांतील गर्दी तशीच राहणार**—सौराष्ट्रामधील रेल्वे-गाड्यांच्या संख्येंत वाढ करण्याची मागणी राजकोट येथील व्यापाऱ्यांनीं व धंदेवाल्यांनीं केली होती. ही मागणी मान्य करतां येणार नाहीं. असें उत्तर रेल्वेमंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं दिलें आहे. रेल्वे गाड्यांतून प्रवाशांची होणारी गर्दी आणखी कांहीं काळ तरी अशीच राहील असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला आहे.

**कोळसा कामगारांचें हित**—कोळसा कामगार मजूर हित-संवर्धन संघटनेनें चालू आर्थिक वर्षांत कामगारांच्या हिताच्या कामासाठी १.६९ कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. कामगारांच्या हितासाठी उभारण्यांत येणाऱ्या निधीची वाढ करण्यासाठी कोळशाच्या दर टनावर घेण्यांत येणारी पट्टी ६ आण्यांवरून ८ आण्यांपर्यंत वाढविण्याचे संघटनेनें ठरविलें आहे.

## एक ऑक्टोबरपासून कित्येक विभागांत मेट्रिक वजनांचाच वापर

आजपासून दहा दिवसांनीं म्हणजे १ ऑक्टोबर १९६० पासून निरनिराळ्या राज्यांतील कांहीं निवडक विभागांत व्यापारी व्यवहारासाठी मेट्रिक वजनांचा वापर चालू होईल. कलकत्ता, मुंबई आणि दिल्ली यांचाहि या विभागांत अंतर्भाव होत असून, देशांतील सुमारें १० टक्के लोकसंख्या त्यांत सामावते.

त्याच दिवसापासून अनेक प्रमुख उद्योगधंद्यांवर— मग ते देशाच्या कोणत्याहि विभागांत असोत—मेट्रिक वजनांचाच वापर करण्याचें बंधन राहील. कापड, मीठ, इंजिनिअरिंग, कॉफी, ताग, लोखंड व पोलाद, अवजड रसायनें आणि कागद यांसारख्या धंद्यांचा त्यांत समावेश होतो. अशा विविध उद्योगधंद्यांत आणि निवडक विभागांत या वजनांचा ऐच्छिक वापर करण्याबाबत १ ऑक्टोबर १९५८ रोजीं हुकूम काढण्यांत आलेला होता. हीं वजनें चालू करण्यासंबंधींची महत्त्वाची सुधारणा अंमलांत आणण्यासाठी जरूर ती पूर्वतयारी करतां यावी आणि व्यापारीवर्ग, तंत्रज्ञ आणि जनता यांना या नव्या वजनांचा चांगला सराव व्हावा म्हणून हा दोन वर्षांचा कालावधि देण्यांत आलेला होता. ही मुदत ३० सप्टेंबर रोजीं संपली म्हणजे मेट्रिक वजनें आपोआपच कायदेशीर आणि इतर वजनें बेकायदेशीर ठरतील.

संसदेनें १९५६ मध्यें वजनमापांच्या प्रमाणकांचा कायदा संमत केला. सध्यां लांबी, क्षेत्रफळ, व्यास आणि भार यांसाठी प्रचारांत असलेल्या मापकांऐवजीं मेट्रिक मापकें वापरण्यांत येतील असें या कायद्यांत नमूद केलेलें आहे. इतक्या महत्त्वाची ही सुधारणा जरूर ती पूर्वतयारी झाल्यावर व लोकांस त्याबाबत माहिती मिळाल्यानंतर टप्प्याटप्प्यानें अंमलांत आणावयाची असल्यानें हा बदल १० वर्षांच्या मुदतींत घडवून आणण्यांत यावा असें कायद्यानें ठरविण्यांत आलें आहे.

भारतांत आजतागायत वजनमापांच्या विविधतेमुळें एकप्रकारचा गोंधळ चालू होता. मेट्रिक वजनमापांमुळें त्या बाबतींत समानता येईल. देशाच्या बऱ्याचशा भागांत शेर आणि मण यांचा प्रचार असला तरी विभागानुसार शेराचें वजन २४ तोळ्यांपासून तो ११२ तोळ्यांपर्यंत निरनिराळें भरतें. आपल्या देशांत वजनें, द्रव पदार्थ मोजण्याचीं मापें इत्यादींचे १५० हून अधिक प्रकार आहेत. मेट्रिक पद्धति हीच एकमेव शास्त्रीय पद्धति आहे; इतकेंच नव्हें, तर तीच सोपी आणि सुटसुटीत असल्यानें देशांत सर्वत्र चालू करण्यासाठी तिचीच निवड करण्यांत आली आहे. मेट्रिक पद्धति ही दशमान आहे. वजनमापांचीं परिमाणें दहाच्या पटीनें वाढत जातात.

नाण्यांची दशमान पद्धति आतां प्रचारांत असल्यानें मेट्रिक वजनेंमापें प्रचारांत आल्यावर दैनंदिन हिशोब आणि व्यवहार अत्यंत सोपे होतील. पूर्वींची किचकट आंकडेमोड करण्याची जरूरी भासणार नाहीं.

एक ऑक्टोबरपासून निवडक म्हणजे नोटिफाईड विभागांत दुकानदारांना अन्नधान्यें, वाणसामान, भाजीपाला, कोळसा यासारख्या जिनसा नव्या म्हणजे मेट्रिक वजनानें विकाव्या लागतील. त्याचप्रमाणें वर उल्लेखिलेल्या कांहीं प्रमुख उद्योगधंद्यांनाहि कच्च्या मालाची खरेदी आणि पक्क्या मालाची विक्री मेट्रिक परिमाणांतच करावी लागेल.

म्हणजेच मेट्रिक वजनें वापरण्याचें बंधन ज्या उद्योगधंद्यांवर नाहीं तथापि तें नोटिफाईड विभागांत चालू असल्यास त्यांनाहि १ ऑक्टोबरपासून हीं नवीं वजनें वापरावीं लागतील. उदाहरणार्थ वनस्पति तेलधंद्यास १ ऑक्टोबरपासून मेट्रिक वजनें वापरण्याचें बंधन नव्हतें. तथापि असा कारखाना निवडक विभागांत उदा. मुंबई, दिल्ली वा कलकत्ता येथें असल्यास त्याला आपल्या किंमती मेट्रिक वजनांत सांगाव्या लागतील; इतकेंच नव्हें तर वनस्पति तेल मेट्रिक वजनांतच द्यावें लागेल.

१ ऑक्टोबर १९५८ रोजीं याबाबत हुकूम काढल्यानंतरच्या कालावधींत बरीचशी पूर्वतयारी करण्यांत आली. हीं वजनेंमापें प्रचारांत आणण्याची व्यवस्था करण्याचे अधिकार राज्य सरकारांकडे आहेत. मध्यवर्ती कायदा संमत झाल्यावर त्यांनीं नवीं वजनेंमापें प्रचारांत आणण्यासाठी योग्य तो कायदा संमत केला.

### वजनांचें उत्पादन

नव्या वजनांचे कारखानदार आणि व्यापारी यांना परवाने देण्यांत आले असून उत्पादनास प्रारंभहि झालेला आहे. निरनिराळ्या राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशांत मिळून परवाने मिळालेले सध्यां सुमारें २४२ कारखानदार आणि ९७२ व्यापारी आहेत. राज्य सरकारांनींहि अंमलबजावणीसाठी जरूर ती यंत्रणा उभारली असून नोकरवर्गास याबाबतचें शिक्षण दिलें आहे. अशी यंत्रणा पूर्वींच अस्तित्वांत असलेल्या राज्यांत ती वाढविण्यांत आली आहे.

### इतर विभाग

निवडक वा नोटिफाइड विभाग सोडून देशाच्या इतर विभागांत एप्रिल १९६० पासून दोन वर्षांचा काल वजनमापांत बदल करण्यासाठी देण्यांत आला आहे. या मुदतींत तेथें मेट्रिक वजनें वापरणें ऐच्छिक राहील. मात्र हा अवधि संपल्यानंतर म्हणजे एप्रिल १९६२ पासून सबंध देशांत मेट्रिक पद्धतीचा वापर आवश्यक ठरविण्यांत आलेला आहे.

अनेक सरकारी खात्यांतून मेट्रिक वजनांचा वापर चालू झालेला आहे. रेल्वेनीं एप्रिल १९६० पासूनच आपल्या व्यापारी व्यवहारासाठी ही पद्धति स्वीकारली आहे, पेट्रोलियम धंद्यांनींहि मेट्रिक पद्धतीचा अंगीकार केला आहे. पेट्रोल आतां गॅलनऐवजीं लिटरमध्यें मिळतें.

## दि पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हन्टस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

### नवीं मंडळें

(१) सल्लागार मंडळ :—(१) मा. भि. वि. पाटील अध्यक्ष (२) मा. आ. ब. टण्णू उपाध्यक्ष. (३) मा. सि. घो. आवनावे (४) मा. रा. ता. कांबळे. (५) मा. त्रिं. रा. देशपांडे.

(२) कार्यकारी मंडळ :— (१) मा. म. चिं. तिखे, कार्याध्यक्ष, (२) मा. द. ना. कुंभार, उपकार्याध्यक्ष. (३) मा. कृ. द. धारमळकर (४) मा. व. रा. कोतवाल (५) मा. ना. घो. भोकरे (६) मा. दि. घों. कुऱ्हाडे (७) मा. कृ. गो. कुंभार (८) मा. म. भा. खोले (९) मा. दि. वि. दामले (१०) मा. स. ग. मिसाळ (११) मा. पु. ना. स्वार.

(३) लोकल ऑडिटर :—मा. श. ना. देशपांडे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.